महाराष्ट्र टाईम्स, पुणे १५ फेब्रुवारी २०११ पृ.क्रं. ७

# नारळीकर, सा. रे. पाटील, कुलकर्णी यांना डी. लिट.

म. टा. प्रतिनिधी

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, ज्येष्ठ शेती संशोधक आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील आणि ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी यांनी डी. लिट. पदवी जाहीर करण्यात आली आहे.

विद्यापीठाचा बाविसावा पदवी प्रदान समारंभ येत्या २६ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. या वेळी मान्यवरांना डी. लिट. पदवी प्रदान करण्यात येईल. या वेळी साहित्य आणि कला, तात्त्विक आणि सामाजिक शास्त्रे, आयुर्वेद, आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्य या शाखांतील विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येईल. यावेळी विद्यापीठाचे कुलपती विश्वनाथ पळशीकर मार्गदर्शन करतील, असे कुलसचिव उमेश केसकर यांनी सांगितले.